महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | Rs.2/- | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे

सोमवार ❖ २३ डिसेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १७८ ❖ पाने - ४ | RNI NO : MAHMAR/2016/72091 | Postal Reg. No. THC/256/2022-2024



## भाच्याच्या लग्नात मामांचा जिव्हाळा

### ठाकरे बंधू एकाच मंडपात

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

तमाम शिवसैनिक आणि मनसैनिकांचं स्वप्न आज एक दिवसासाठी का होईना सत्यात उतरलं. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे एकमेकांसमोर उभे ठाकले.. दोघेही कोणताही राजकीय आडपडदा न ठेवता भावाभावांसारखे जिव्हाळ्याने वागले. ठाकरे बंधुंनी आपुलकीनं एकमेकांशी आणि कुटुंबियांशीही जिव्हाळ्याचा संवाद करत होते. निमित्त होतं ते राज ठाकरेंच्या बहिणीच्या मुलाच्या लग्नाचं.. मुंबईतल्या दादरच्या शिवाजी विद्यालयात हा लग्नसोहळा पार पडला. त्याला राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे सहकुटुंब उपस्थित होते. यानंतर राज आणि उद्धव ठाकरे राजकीय पटलावरही एकत्र येणार का याच्या चर्चा सुरु झाल्यात. ज्या महाविकास आघाडीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आहे त्याचा घटकपक्ष काँग्रेसनंही या भेटीपेक्षा जनतेचे प्रश्न जास्त महत्त्वाचं असल्याचं म्हटलंय. शिवसेना आणि काँग्रेस पक्षासाठी ठाकरे भेटीचा मुद्दा महत्त्वाचा नसला तरी तो राज्याच्या राजकारणाच्या दृष्टीनं खूप महत्त्वाचा आहे. कारण एकीकडे पक्षफुटीमुळे शिवसेना उबाठाची ताकद निम्मी झालीय. विधानसभा निवडणुकीत शिवसेना आणि मनसे या दोघांचं पानिपत झालंय. अशात आगामी मुंबई महापालिका आणि इतर निवडणुकांमध्ये राज आणि उद्धव ठाकरेंची एकजूट झाली. तर मराठी आणि हिंदुत्वाच्या मुद्द्यावरील मतांना आपल्याकडे खेचण्यात दोन्ही ठाकरे यशस्वी ठरु शकतात.. त्यामुळं राज्यात कमकुवत होत चाललेल्या प्रादेशिक पक्षांना एक दिशा मिळू शकते. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीतही राज आणि उद्धव यांच्या एकत्र येण्याने भाजपला थेट फटका बसू शकतो.. त्यामुळं सध्या लग्नात एकत्र दिसलेले ठाकरे बंधू भविष्यात राजकीय व्यासपीठावर हातात हात घेऊन उभे राहतात का याकडे तमाम महाराष्ट्राचं लक्ष असेल.

# वाळू माफियांवर महसूल विभागाची टाच

> “देशातील सर्वात चांगला महसूल विभाग महाराष्ट्राचा असेल, अशी ओळख निर्माण करणार
>
> – महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**☐ प्रतिनिधी**

नागपूर : जनतेसाठी त्रासदायक ठरलेल्या महाराष्ट्रातील वाळू माफियागिरीला पायबंद घालण्यासाठी सरकार विशेष लक्ष देईल. वाळू विषयक सुलभ धोरण आणू, अशी घोषणा राज्याचे नवनियुक्त महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. 'जनतेला वाळू सहज उपलब्ध होईल, असं सुलभ धोरण देशातील कोणत्या राज्यात आहे, त्यासंदर्भात अभ्यास करून महाराष्ट्रात वाळूविषयक सुलभ धोरण अस्तित्वात आणू,' असं चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले आहेत.

सर्वात चांगला महसूल विभाग महाराष्ट्राचा असेल : 'महसूल विभागामुळं जनतेला त्रास होतोय, हे मी पाहू शकत नाही. 'जनता सर्वोपरी' असं आपलं कामकाजाचं धोरण राहणार असून देशातील सर्वात चांगला महसूल विभाग महाराष्ट्राचा असेल अशी ओळख मी निर्माण करेन,' असा निर्धार बावनकुळे यांनी व्यक्त केला. 'राज्यात सुमारे ८६ हजार हेक्टर झुडपी जंगल जमिनींचा प्रश्न प्रलंबित आहे. यामुळं अनेक विकास प्रकल्प रखडले आहेत. या जमिनी प्रामुख्यानं विदर्भात अधिक असून, यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात खटला चालू आहे. या खटल्याच्या बाबतीत न्यायालयात पाठपुरावा करून, हा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार,' असंही बावनकुळे यांनी सांगितलं.

### जनतेचे हेलपाटे कमी करू :

'शेतकरी-शेतमजुरांशी संबंधित असणाऱ्या या खात्यात अनेक कायद्यांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. त्याचा अभ्यास करून राज्याच्या विकासाची गती वाढविण्यात येईल. कागदपत्रांशी निगडित नागरिकांची महसूल खात्याशी संबंधित अनेक कामं असतात. नागरिकांना या कामांसाठी पान ४ वर ▶▶



## तीन महिन्यात निवडणुकांचा धुरळा?

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**☐ प्रतिनिधी**

**नागपूर :** नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीनंतर आता राज्यात पुन्हा एकदा निवडणुकीचा धुरळा उडणार आहे. राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संकेतही दिले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत सुप्रीम कोर्टात जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सुनावणी होण्याची शक्यता आहे.

> “राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या मागील जवळपास ३ वर्षांपासून रखडल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सुप्रीम कोर्टात सुनावणी सुरू आहे. सुप्रीम कोर्टात दाखल झालेल्या याचिकांवरील सुनावणी जानेवारीत होण्याची शक्यता आहे. ही सुनावणी ४ जानेवारी रोजीच होण्याची शक्यता असून, तीन महिन्यांत निवडणुका व्हायला हव्यात, असा प्रयत्न आहे
>
> – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**सुप्रीम कोर्टात होणार सुनावणी**

विधानसभा निवडणुकीतील महायुतीला दमदार यश मिळाले. या निवडणुकीत भाजपने आतापर्यंतच्या सर्वाधिक जागांवर विजय मिळवला. विधानसभा निवडणूक निकालानंतर भाजपने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी तयारी सुरू केली आहे. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या मागील जवळपास ३ वर्षांपासून रखडल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सुप्रीम कोर्टात सुनावणी सुरू आहे. सुप्रीम कोर्टात दाखल झालेल्या याचिकांवरील सुनावणी जानेवारीत होण्याची शक्यता आहे. ही सुनावणी ४ जानेवारी रोजीच होण्याची शक्यता असून, तीन महिन्यांत निवडणुका व्हायला हव्यात, असा प्रयत्न असल्याचे वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मुख्यमंत्र्यांचे हे वक्तव्य स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांचे संकेत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

नागपुरात भाजप कार्यकर्त्यांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी फडणवीस यांनी 'मन की बात' सांगितली. विधानसभेतील विजयामुळे कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे आणि भाजपसाठी सकारात्मक वातावरण आहे. त्यामुळेच याचा फायदा उचलून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विजयाचे पक्षाकडून नियोजन सुरू करण्यात आले आहे. यादृष्टीनेच नवनियुक्त मंत्री, आमदार यांच्या उपस्थितीत नागपुरात कार्यकर्त्यांच्या सदस्य नोंदणी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले की, विधानसभेतील विजयामुळे सरकार, लोकप्रतिनिधी व पक्षावरील जबाबदारी वाढली आहे. सर्वांनी जबाबदारीने वागणे अपेक्षित आहे. सरकार व जनतेदरम्यान संघटनेमार्फत समन्वय राहावा असा भर राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. तिघांमध्येही योग्य समन्वय असला तर काय होऊ शकते हे विधानसभेतील निकालांतून समोर आले आहे. भाजपचे कार्यकर्ते निवडणुकीत अक्षरशः जादूगारच झाले होते, असे कौतुकोद्गार मुख्यमंत्री फडणवीस यांनी काढले.



## मंत्र्यांच्या स्टाफ निवडीला लगाम

### मर्जीनुसार स्टाफ निवडता येणार नाही

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता ☐ प्रतिनिधी**

राज्यातील विधानसभा निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळाले. त्यानंतर ५ डिसेंबरला देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची तर एकनाथ शिंदे, अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यानंतर १५ डिसेंबरला ३९ मंत्र्यांनी शपथ घेतली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २१ डिसेंबरला खातेवाटप केले. खातेवाटप केल्यानंतर आता प्रत्येक मंत्र्यांकडे खासगी सचिव, पीए आणि विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांनी आणि स्टाफच्या नेमणुकीची लगबग सुरू झाली आहे. या मंत्र्यांच्या स्टाफ नेमणुक करताना आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची परवानगी घ्यावी लागणार आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळातील वादग्रस्त अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या रोखण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांचा प्रयत्न आहे. देवेंद्र फडणवीस हे २०१४ साली पहिल्यांदा मुख्यमंत्री झाल्यानंतर अशास्वरूपाचा फॉर्म्युला त्यांनी वापरत मंत्रालयात वादग्रस्त अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या रोखल्या होत्या. आताही त्याच पद्धतीचा फॉर्म्युला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वापरणार आहेत. त्यामुळे महाविकास आघाडी सरकारच्या काळात काम केलेल्या अधिकाऱ्यांच्या नेमणुकीला ब्रेक लागणार आहे.

## ठाणे जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागात सावळा गोंधळ

**अधिकाऱ्यांचा दुष्काळ, कसे होणार दर्जेदार शिक्षण?**

“
- ३ गट शिक्षण अधिकारी
- २० विस्तार अधिकारी
- ६० केंद्र प्रमुख
- १०० हून अधिक मुख्याध्यापक
- ३६० हून अधिक शिक्षकांची पदे रिक्त

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**☐ प्रतिनिधी**

**ठाणे :** ठाणे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागात गेली अनेक वर्ष अधिकाऱ्यांची कमतरता आहे. अधिकारी विना जिल्ह्यातील शाळाचा कारभार सुरु आहे.या शिक्षण विभागाआंतर्गत भिवंडी, कल्याण, अंबरनाथ, मुरबाड व शहापूर या तालुक्यातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळांचा समावेश आहे. या शाळामध्ये हजारो विध्यार्थी शिक्षण घेत आहेत. विशेष म्हणजे या शाळांची पट संख्या दिवसांगणिक कमी होत आहे. एकीकडे अपुरे शिक्षक, तर दुसरीकडे अधिकाऱ्यांची भीषण टंचाई या वास्तव स्थितीतीत जिल्हा परिषद शिक्षण विभागाचा कारभार सुरु आहे. यात ही अनेक अधिकारी तालुकयात पगार काम करण्यासाठी ठाणे जिल्हा परिषद कार्यालयात पाच ते सात वर्ष कार्यरत आहेत.यांचा तालुक्याला काहीही फायदा नाही. रुबाब मात्र शिक्षण अधिकाऱ्यांना लाजवणारा असतो.

जिल्हा परिषद शिक्षण विभागात समाविष्ट तालुक्यात केंद्रप्रमुख नाहीत. विस्तार अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. उप शिक्षणाधिकारी नाहीत. पाच तालुक्याचा कारभार रामभरोसे सुरु आहे. मुरबाड तालुक्यात २६ केंद्र प्रमुख व १० विस्तार अधिकारी गेली सात वर्ष पान ४ वर ▶▶




## राज्यातील कंत्राटी शिक्षक भरतीला ब्रेक

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील भरती प्रक्रिया पुन्हा थांबली आहे. यामुळे पटसंख्या कमी असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये कंत्राटी शिक्षकांच्या भरतीचा निर्णय लांबणावर गेला आहे.

राज्यसरकारकडून जिल्हा परिषदेच्या ज्या शाळांमध्ये १ ते २० विद्यार्थीसंख्या (पट) आहे. अशा सर्व शाळांवर सेवानिवृत्त शिक्षक नेमण्याचा शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला. त्यानंतर त्या निर्णयात अचानक बदल करून दहापर्यंत पटसंख्या असलेल्या शाळांवर कंत्राटी शिक्षक डीएड, बीएडधारक सुशिक्षित तरुण-तरुणींना नेमण्याचा निर्णय झाला. आता पुन्हा तो निर्णय थांबविण्यात आला असून कमी पटसंख्येच्या झेडपी शाळांवरील शिक्षकांचा प्रश्न 'जैसे थे' आहे. शालेय शिक्षण विभागाला यासंदर्भात आता नवीन शिक्षणमंत्र्यांच्या आदेशाची प्रतीक्षा आहे.

राज्यातील १४ हजार ७८३ शाळांमधील पटसंख्या १ ते २० पर्यंत असून त्यात पुणे जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ३,६२९ पैकी एक हजारापेक्षा जास्त शाळा आहेत. त्यात ३०० हून जास्त शाळांचा पट दहापेक्षा कमी आहे. या शाळांवर कंत्राटी शिक्षक घेण्याचा निर्णय झाला होता. पण, त्याची कार्यवाही थांबल्याने शासनाच्या धरसोड भूमिकेवर डीएड-बीएडधारक तरुण-तरुणी वैतागले आहेत. राज्यात ३० ते ३२ हजार शिक्षकांची भरती केली जाईल, अशी ग्वाही तत्कालीन शिक्षणमंत्र्यांनी दिली होती. मात्र, अजूनही जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये सात हजारांवर शिक्षक कमीच आहेत. अजूनही समानीकरणाअंतर्गत हजारो शाळांमध्ये पटसंख्येच्या तुलनेत शिक्षक भरलेले नाहीत.

'टीईटी' पार पडल्यानंतर या परीक्षेचा निकाल पान ४ वर ▶▶



# मुस्लिम धर्मियांच्या संमेलनाला हिंदू कार्यकर्त्यांचे सहकार्य

❍ दै.ठाणे जीवनदीप वार्ता ❍

**कर्जत/बदलापुर :** अंबरनाथ तालुक्यातील वांगणी रेल्वे स्थानका जवळ गोरेगाव या गावात २१ व २२ डिसेंबर असे दोन दिवस ईजतेमा या नावाचे मुस्लिम धर्म संमेलन सुरू आहे. या संमेलनाला मुंबई महानगर प्रदेशातील तब्बल दीड ते दोन लाख मुस्लिम धर्मियांच्या उपस्थितीचा अंदाज आहे.

यासाठी राज्य सरकारने खूप मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे. ठाणे ग्रामीण च्या रॅपिड ॲक्शन फोर्स च्या तुकड्या ही बंदोबस्तासाठी आलेल्या आहेत. या सर्व पोलीस बंधू भगिनींचि व्यवस्था वांगणी तील सामाजीक कार्यकर्ते करीत असल्याचे आश्वासक चित्र या निमित्ताने पहायला मिळाले. यापैकी दंगल प्रतिबंधक जवानांची एक तुकडी वांगणी मधे त्यांच्या मोठ्या गाडीसह मुक्कामी आहे. यामधे तीस जवानांचा समावेश आहे. वांगणी ग्रामपंचायत चे माजी सदस्य व मध्य रेल्वेच्या उपनगरीय सल्लागार समितीचे सदस्य मनोहर शेलार यांनी आपल्या राजलक्ष्मी हॉटेल मध्ये या जवानांची झोपण्याची व्यवस्था केली आहे. तसेच या सर्व जवानांना २०० मिलिं पाण्याच्या बाटल्या व फिल्टर पाण्याचे जार यांची व्यवस्था करून दिली आहे. शिवाय ज्यांना गरज असेल त्यांना जेवण देण्याची तयारी मनोहर शेलार यांनी आपल्या हॉटेल मध्ये ठेवली आहे. तसेच बदलापुर टिटवाळा व अन्य पोलीस ठाण्यातून आलेल्या स्थानिक पोलीस कर्मचारी यांना मनोहर शेलार,विठ्ठल शेलार,गुरुनाथ शेलार यांनी चहा पाण्याची व्यवस्था केली आहे. तसेच महिला कर्मचारी यांना हॉटेल राजलक्ष्मी चे प्रसाधनगृह वापरण्यासाठी खुले ठेवले आहे.

सामाजिक सलोखा राखण्यासाठी दक्ष असणाऱ्या पोलीस प्रशासनाला सहकार्य करणे हे कार्यकर्ता म्हणून आपले कर्तव्यच आहे अशी भावना यावेळी मनोहर शेलार यांनी व्यक्त केली. शेलार यांच्या या सहकार्या बद्दल पोलीस प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही त्यांचे कौतुक करून त्यांना धन्यवाद दिले आहेत.




# भगवान जाधव यांना शिक्षणरत्न पुरस्कार

❍ दै.ठाणे जीवनदीप वार्ता ❍

**वासिंद, ता. २२ :** वासिंद येथील सरस्वती विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयाचे सेवानिवृत्ती मुख्याध्यापक भगवान जाधव यांना रोटरी क्लब ऑफ हिरानंदानी लिजेंडस् ठाणे आणि फॅन्ड्री फौंडेशनतर्फे शिक्षक रत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

शनिवारी (ता. २१) शहापूर येथे वैश्य समाज हॉलमध्ये आयोजित एका भव्य कार्यक्रमात मुख्य अतिथी खासदार सुरेश म्हात्रे (बाल्या मामा) यांच्या हस्ते शाल श्रीफळ प्रशस्तीपत्र व सन्मान चिन्ह देऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. आपल्या सेवा काळात भगवान जाधव सर यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी व सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रमांचे, नियोजन व उपयोजन करून महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. समर्पित भावनेने काम करणारे एक व्यासंगी, विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून त्यांचा लौकिक आहे. सेवानिवृत्तीनंतरही कवी, लेखक, पत्रकार, प्रवचनकार, व्याख्याते आदी विविध भूमिकेतून भगवान जाधव, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व आध्यात्मिक क्षेत्रात प्रबोधन करून महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. या कार्याची नोंद घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी रोटरी क्लब ऑफ हिरानंदानी लिजेंडस् ठाणे चे अध्यक्ष निलेश दहीफुले सचिव रचिता मुल्की फॅन्ड्री फाउंडेशन च्या संचिता शेखर आदी मान्यवरांसह शहापूर तालुक्यातील मुख्याध्यापक, शिक्षक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# कांद्याच्या दरात घसरण गृहिणींना दिलासा




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : गेल्या काही महिन्यांपासून कांद्याचे दर चढेच होते. घाऊक बाजारात साठी गाठलेले कांद्याचे दर आता आवाक्यात येत आहेत. घाऊक बाजारात आधी जुना कांदा प्रतिकिलो कांदा ५०-६० रुपयांवर होता. मात्र आता जुना कांदा तुरळक असून नवीन कांदा अधिक प्रमाणात दाखल होत आहे. त्यामुळे नवीन कांद्याच्या दरात प्रतिकिलो १०-१५ रुपयांनी घट झाली आहे. घाऊक बाजारात नव्या कांद्याची २०-३० रुपयांना विक्री होत आहे. एपीएमसी बाजारात उन्हाळी आणि पावसाळी अशा दोन कांद्याचा हंगाम असतो.

नोव्हेंबरमध्ये पावसाळी नवीन कांदा दाखल होत असतो, मात्र परतीच्या पावसाने राज्यातील नवीन कांद्याच्या उत्पादनावर पाणी फेरले होते. त्यामुळे नवीन कांद्याचा हंगाम लांबला आणि जुने कांदे वरचढ ठरत होते. परिणामी कांद्याच्या दरात सातत्याने वाढ होत होती. गेल्या काही महिन्यांपासून कांद्याचे दर चढेच होते. जुना कांदा घाऊक बाजारात प्रतिकिलो ७० रुपयांपर्यंत गेला होता. तर नवीन कांदे ही वरचढ ठरत होते. नवीन कांदा ५०-५५ रुपयांनी विक्री होत होता. मात्र बाजारात राज्यातील नवीन कांद्याची आवक वाढली आहे. नवीन कांदा मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्याने दर गडगडत आहेत, अशी माहिती व्यापारी मनोहर तोतलानी यांनी दिली आहे.

# मुलाच्या मालमत्तेवर पालकांचा हक्क असतो का?



पालकांच्या मालमत्तेवर मुलांचा हक्क असतो याची सर्वांना कल्पान आहे. पण, मुलांच्या मालमत्तेवर पालक मालकी हक्क सांगू शकतात का? या प्रश्नाचे उत्तर अनेकांना माहिती नाही. अशा प्रकरणांसाठी कायद्याचे वेगळे नियम वेगळे असून, स्त्री आणि पुरुषांसाठी हे नियम बदलतात. हिंदू उत्तराधिकार कायद्यात केलेल्या महत्त्वाच्या सुधारणांनंतर, भारतीय उत्तराधिकार कायद्यांतर्गत पालकांना त्यांच्या मुलांच्या मालमत्तेवर हक्क सांगता येतो का? याची माहिती आपण घेणार आहोत.

**सर्वसाधारण नियम**

कायद्यानुसार पालकांना त्यांच्या मुलांच्या मालमत्तेवर स्वयंचलित अधिकार नसतात. पण, अशी काही विशिष्ट उदाहरणे आहेत ज्यात ते त्यावर दावा करू शकतात. २००५ मध्ये दुरुस्त केलेला हिंदू उत्तराधिकार कायद्यातील अटींनुसार, मृत्यूपत्राशिवाय मुलाचा मृत्यू झाल्यास पालकांना त्यांच्या मुलाच्या मालमत्तेचा वारसा मिळू शकतो.

**पालकांना मुलाच्या मालमत्तेत हक्क केव्हा मिळतो?**

हिंदू उत्तराधिकार कायद्यानुसार एखाद्या प्रौढ, अविवाहित मुलाचे मृत्यूपत्र न करता निधन झाल्यास पालकांना मुलाच्या मालमत्तेचा वारसा मिळण्याचा हक्क आहे. महत्त्वाची बाब म्हणजे पालकांना मुलाच्या मालमत्तेची पूर्ण मालकी मिळत नाही. तर, आई आणि वडील दोघांनाही मालमत्तेचे वेगळे - वेगळे अधिकार दिले जातात. याचा अर्थ असा की वारसा हक्क दोन पालकांमध्ये सामायिक केले जातात परंतु दोघांपैकी एकाला पूर्ण मालकी दिली जात नाही.

**आई प्रथम वारस**

मुलाचा अकाली मृत्यू झाल्यास हिंदू उत्तराधिकार कायदा प्रथम वारस म्हणून आईला प्राधान्य देतो. तर वडिलांना दुसरा वारस म्हणून मालमत्तेवर दावा करण्याचा अधिकार आहे. आई हयात नसेल किंवा वारसा हक्क सांगू शकत नसेल, तर दुसरा वारस म्हणून वडिलांचे हक्क लागू होतात. ज्या प्रकरणांमध्ये वडील आणि इतर दावेदार वारसाहक्कासाठी इच्छुक आहेत, वडील इतर वारसांसोबत समान रीतीने इस्टेट शेअर करतील.

**मुलगा आणि मुलीसाठी वेगवेगळे नियम :**

मुलाच्या मालमत्तेवर पालकांचे वारसा हक्क देखील मूल स्त्री किंवा पुरुष यावर अवलंबून असतात. हिंदू उत्तराधिकार कायद्यात या लिंग-आधारित भेदांची रूपरेषा स्पष्ट करण्यात आली आहे. मुलगाः जर मुलगा मृत्यूपत्र न करता मरण पावला, तर आई ही पहिली वारस असते, त्यानंतर वडील असतात. पण, जर आई हयात नसेल, तर वडील, इतर संभाव्य वारसांचा, इस्टेटमध्ये समान वाटा असतो.

मुलीः याउलट, जर एखाद्या मुलीचे मृत्युपत्राशिवाय निधन झाले, तर तिची मालमत्ता प्रामुख्याने तिच्या मुलांना आणि तिच्या पतीनंतर वारसांना मिळते. मृत मुलीचे पालक सामान्यतः तिच्या मालमत्तेचा वारसा घेण्यात सर्वात शेवटी असतात. तसेच, मुलगी अविवाहित असल्यास, तिच्या पालकांना तिचे वारस मानले जाते. तथापि, जर मुलगी विवाहित असेल आणि तिचे निधन झाले असेल तर, वारसा प्रणाली तिच्या मुलांना (असल्यास) आणि नंतर तिच्या पतीला प्राधान्य दिले जाते बदलते. या वारसांना त्यांचा वाटा मिळाल्यानंतरच पालकांना मालमत्तेचा हक्क मिळतो.

# अल्पवयीन मुलीशी परप्रांत्रीयाचे अश्लील चाळे

## जाब विचारला असता शेजार्‍याने केली मारहाण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

**कल्याण :** कल्याण पूर्वेतील अडीवली परिसरात एका इमारतीत राहणाऱ्या एकाने आपल्या शेजार्‍याला आपल्या मुलीशी अश्लील चाळे का केले हा जाब विचारला असता शेजार्‍याने जाब विचरण्यास आलेल्या शेजार्‍याला मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार शनिवारी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास घडला. याप्रकरणी तक्रारदार यांच्या तक्रारी वरून मानपाडा पोलिसांनी उत्तम पांडे आणि त्यांची पत्नी यांच्या वर गुन्हा दाखल केला आहे.

चार वर्षाच्या मुलीशी अश्लील चाळे करणाऱ्याला जाब विचारण्यास एक महिला आपल्या शेजाऱ्याकडे केली. पण तिच्याशी चर्चा न करता तिच्यासह तिच्या मराठी कुटुंबाला मारहाण झाली आहे. उत्तम पांडे असे मारहाण करणाऱ्या इसमाचे नाव आहे. पांडे यांच्या पत्नीनेदेखील मारहाण केली. यानंतर पीडित मराठी कुटुंबाकडून पोलीस स्थानकात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

मारहाणीत मराठी महिला आणि आईला गंभीर मार लागला आहे. तसेच तिचा पती जखमी झाला आहे. मराठी महिलेचा पती हा पोलीस कर्मचारी आहे. ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. मानपाडा पोलीस ठाण्यात यासंदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस यासंदर्भात तपास करत आहेत.

# कल्याण मुरबाड रेल्वे मार्गाचा विस्तार माळशेज घाटाच्या सावरणे गावापर्यंत करा - मधुकर वाल्हेकर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

**कल्याण :** सध्या होऊ घातलेला मुरबाड ते कल्याण २८ किलोमीटरचा मार्ग केवळ मुरबाड पर्यंतच न ठेवता त्याचा विस्तार मुरबाड तालुक्यातील माळशेज घाटाच्या पायथ्याशी असलेले व सह्याद्री पर्वताला खुनवणारे निसर्गरम्य सावरणे गावापर्यंत करा अशी मागणी मुंबई माळशेज नगर रेल्वे प्रवाशी संघाचे अध्यक्ष मधुकर वाल्हेकर यांनी केली आहे ठाणे पुणे आणि अहमदनगर तसेच नाशिक जिल्ह्यालाही कवेत घेणार हा रेल्वे मार्ग भविष्यात महाराष्ट्राच्या विकासाची नांदी ठरणार आहे १९७० पासून केवळ चर्चेच्या गृहात अडकलेला कल्याण अहिल्यानगर( अहमदनगर) हा रेल्वे मार्ग फार आधीच व्हायला हवा होता परंतु राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे हा रेल्वे मार्ग रखडला असून केंद्र सरकारने मुरबाड ते कल्याण असा




२८ किलोमीटरचा रेल्वे मार्ग सध्या प्रस्तावित केला असून त्याचा सर्वे झाला आहे कुठल्या अडचणीमुळे हा रेल्वे का रखडला हे कळू शकले नाही तुर्तास प्रलंबित असे चित्र दिसत असून निवडणुकीनंतर या मार्गाचे काम चालू होणे आवश्यक होते हा रेल्वे मार्ग केवळ मुरबाड पर्यंत न थांबवता त्याचा विस्तार मुरबाड शिवळे सरळगाव टोकावडे वैशाखरे मार्गे माळशेज घाट असा व्हायला हवा मुरबाड तालुक्यातील माळशेज घाटाच्या पायथ्याशी असलेला आदिवासी बांधवांच्या जीवनामध्ये विकासाचे वारे येण्यासाठी हा रेल्वे मार्ग संस्थापरीत करण्यात यावा अशी मागणी करण्यासाठी विधानसभा निवडणूक नंतर मधुकर वाल्हेकर, ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब भालेराव व मुरबाड तालुका अध्यक्ष रमेश घरत दिल्लीमध्ये केंद्रीय रेल्वेमंत्री व महाराष्ट्रातील खासदारांची भेट घेऊन निवेदन देणार असल्याचे मधुकर वाल्हेकर यांनी सांगितले

आशिया खंडातील पहिली भारतीय प्रवासी लोकल सुरू करण्याचा मान स्व नाना शंकर शेठ यांना जातो त्या नाना शंकर शेठ यांचा जन्म मुरबाड तालुक्यात झाला परंतु मुरबाडवासीयांच दुर्दैव अजूनही मुरबाड मध्ये रेल्वे धावू शकलेली नाही २८ किलोमीटरची रेल्वे केवळ मुरबाड पर्यंतच प्रस्तावित असून तिचा विस्तार माळशेज घाटापर्यंत करा अशी मागणी ते दिल्ली दरबारी करणार आहेत वेळी चाळीस वर्ष कल्याण ते अहिल्यानगर (अहमदनगर) रेल्वे मार्गासाठी ते सातत्याने आवाज उठवित आहेत अनेक संघटना अनेक सामाजिक कार्यकर्ते यांनी सुद्धा या रेल्वेमार्गासाठी सह्यांची मोहीम निवेदन मोर्चे आंदोलन यामध्ये विशेषता पुणे आणि अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यातील पत्रकार सामाजिक कार्यकर्ते आणि राजकीय कार्यकर्त्यांचा समावेश आहे तरीसुद्धा ही रेल्वे अजून पर्यंत तरी प्रगती च्या काठावर आलेली नाही १९९३ सालात माजी मंत्री मुख्यमंत्री देशाचे संरक्षण मंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष शरद पवार यांचे अध्यक्षतेखाली रेल्वे परिषद बोलवण्यात आली होती परंतु ती रेल्वे परीक्षेत यशस्वी होऊ शकली नाही अजून पर्यंत मुरबाड करांचे नगरकरांचे स्वप्न हवेतच आहे २०२५ मध्ये तरी मुरबाड रेल्वेचे काम युद्ध पातळीवर सुरू व्हावे यासाठी आम्ही दिल्ली दरबारी जाणार असल्याचे मधुकर वाल्हेकर यांनी बोलताना सांगितले

# डोंबिवली जिमखाना 'उत्सव २०२४'चे उद्घाटन



महाराष्ट्र टाइम्सचे निवासी संपादक माननीय श्री. समीर कर्वे यांच्यासोबत डोंबिवली जिमखानाचे अध्यक्ष दिलीप भोईर, सचिव पर्णाद मोकाशी, खजिनदार आनंद डिचोलकर, आणि सर्व जिमखाना सदस्य आणि तमाम डोंबिवलीकरांच्या साक्षीने शानदार सोहळा पार पडला.

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
डोंबिवली □ शरद शहाणे

२७ व्या वर्षात पदार्पण होत असलेल्या डोंबिवली जिमखाना उत्सव चे उद्घाटन महाराष्ट्र टाइम्सचे निवासी संपादक माननीय श्री. समीर कर्वे यांच्यासोबत डोंबिवली जिमखानाचे अध्यक्ष दिलीप भोईर, सचिव पर्णाद मोकाशी, खजिनदार आनंद डिचोलकर, आणि सर्व जिमखाना सदस्य आणि तमाम डोंबिवलीकरांच्या साक्षीने शानदार सोहळा पार पडला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ,आमदार रवींद्र चव्हाण, नवनिर्वाचित आमदार राजेश मोरे, हे सर्वजण विधानसभेचे अधिवेशन आणि मंत्रिमंडळ विस्तारात व्यस्त असल्याकारणाने या उत्सव उद्घाटन कार्यक्रमाला येऊ शकले नाही. डोंबिवलीकरांचे लाडके आमदार रवींद्र चव्हाण यांनी मात्र वरचे प्रेम कायम ठेवत डोंबिवली जिमखाना उत्सव २०२४ ला व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे भरभरून शुभेच्छा दिल्या.

**डोंबिवली जिमखाना उत्सव चे ब्रीदवाक्य 'सर्वांसाठी सर्वकाही'**

याच उद्देशाने या उत्सव यात्रेत उद्योजकांना उत्तेजन देण्यासाठी अनेक प्रकारचे स्टॉल, मनोरंजन, क्रीडा, खाद्य जत्रा, बँका आणि रियल इस्टेट त्याचप्रमाणे बाळ गोपाळ यांच्या स्पर्धा मनोरंजन अगदी लहानांपासून जेष्ठांपर्यंत सर्वांसाठी सर्वकाही असणाऱ्या जिमखाना उत्सव यात्रेत डोंबिवली कल्याण आणि ग्रामीण भागातून एवढेच ठाणे मुंबई येथून सुद्धा अनेक उत्सव प्रेमी या डोंगरी जिमखानाच्या उत्सवाला येत असतात आणि काही ना काही घेऊन जात असतात आणि तोच आनंद वर्षभर साठवून पुढल्या वर्षाचे वाट पाहत असतात असा हा सर्वांनाच हवा असणारा डोंबिवली जिमखाना उत्सव संपूर्णपणे यशस्वी करण्यासाठी सर्व सदस्य पोलीस अग्निशामक गाडी ॲम्बुलन्स सज्ज असतात

# भातसई आश्रमशाळेत गाडगे महाराज पुण्यतिथी उत्सव संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
वासिंद (प्रतिनिधी)



श्री गाडगे महाराज प्राथमिक /माध्यमिक आश्रमशाळा भातसई येथे श्री संत गाडगे महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित उत्सव मोठ्या उत्साहात पार पडला.

ह.भ.प.कोंडू महाराज जाधव यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व ह.भ.प. शिवाजी जाधव यांच्या हस्ते विणा पुजनाने या पुण्यतिथी उत्सवास सुरुवात करण्यात आली. गुरुवार १९ ते शुक्रवार २० डिसेंबर असे दोन दिवशीय आयोजित या पुण्यतिथी उत्सव निमित्ताने अंधश्रद्धा, अज्ञान, शिक्षण, व्यसनमुक्ती, अस्पृश्यता निर्मूलन व भारतीय संस्कृती या विषयी प्रबोधनपर व्याख्यान, किर्तन व प्रवचन आदी धार्मिक कार्यक्रम व उपक्रम राबवून हा उत्सव साजरा करण्यात आला. ह.भ.प. विक्रम महाराज पोंडेकर (देवाची आळंदी ) यांचे काल्याचे किर्तनानी या उत्सवाची सांगता झाली तर गोपाला, गोपाला देवकीनंदन गोपाला अशा स्वरांनी व भक्तीमय वातावरणात हा उत्सव पार पडला असल्याचे शाळेचे संचालक भास्कर साठे यांनी म्हटले. यासाठी शाळेचे संचालक, मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षिकेतर कर्मचारी व भातसई ग्रामस्थ यांनी परिश्रम हाती घेतले होते.

# अनधिकृत भंगार गोडाऊनवर पोलिसांचा छापा

## १० लाखांचा स्टील बार जप्त, आरोपीस अटक

**दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण :** पेण मुंबई-गोवा पेण तालुक्यातील जिते गावाजवळ असणाऱ्या आकाशदीप हॉटेलच्या पाठीमागे अनधिकृतपणे भंगाचा बट्टा उभारला असून या ठिकाणी कंपन्यांचा येणार माल चोरीद्वारे घेतला जात असल्याची माहिती दादर सागरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय कुमार ब्राह्मणे यांना मिळताच त्यांनी त्या ठिकाणी धाड टाकून जेएसडब्ल्यू कंपनीचा १० लाखांचा स्टील का रायगड जिल्ह्याच्या अनेक भागांमध्ये गेल्या काही दिवसांपासून अनधिकृतपणे भंगारवाल्यांचे जाळे मोठ्या प्रमाणावर पसरले आहे. जेएसडब्लू कंपनी डोलवी येथून टीएमटी स्टील बार माल विविध कंपन्यांना सप्लाय करण्यासाठी ज्योती स्ट्रान्सपोर्ट मधील ट्रेलर एमएच ४६ बीएम ६५८९ वरील मालक व इतर काही ट्रेलरमधून जात होता. चालकांनी सदरचा पूर्ण माल विविध कंपन्यांना न पुरविता अंदाजे १५ ते २० टन मालाचा अपहार करून ती जिते येथील आकाशदीप हॉटेलच्या पाठीमागे मोकळ्या जागी अनधिकृतपणे उतरवले असल्याची माहिती फिर्यादी कंपनीचे जनरल मॅनेजर पंकज कुमार अग्रवाल यांनी दादर सागरी पोलीस स्टेशनला दिली. त्यानुसार पोलीस निरीक्षक संजयकुमार जाडाणे धाड टाकून माल जप्त केला.




सोमवार
२३ डिसेंबर २०२४

**मेष**
तुम्हाला प्रत्येक टप्प्यावर मित्रांकडून सहकार्य मिळेल. आजचा दिवस तुमच्यासाठी छान असेल. बेरोजगारांना रोजगाराच्या संधी मिळतील. सर्व प्रलंबित कामांमध्ये यश मिळेल.

**वृषभ**
धार्मिक कार्याकडे तुमचा कल राहील. इतरांना मदत करण्यात रस वाढेल. जर तुम्ही कोणाकडून पैसे घेतले असतील तर तुम्ही ते लवकरच परत कराल. स्पर्धा

**मिथुन**
दिवस तुमच्यासाठी छान असेल. बेरोजगारांना रोजगाराच्या संधी मिळतील. प्रलंबित कामांमध्ये यश मिळेल. विद्यार्थी अभ्यासात रस घेतील आणि जबाबदाऱ्या समजून घेतील.

**कर्क**
विद्यार्थी अभ्यासात रस घेऊन त्यांच्या जबाबदाऱ्या चांगल्या प्रकारे समजून घेतील. नवीन व्यवसाय सुरू करणे फलदायी ठरेल. आज या राशीच्या लोकांची आर्थिक स्थिती मजबूत होईल.

**सिंह**
मुलांकडून काही चांगली बातमी मिळू शकते. वैवाहिक जीवन आनंदाने भरलेले असेल. आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने तुमच्यासाठी उत्तम राहील.

**कन्या**
नवीन व्यवसाय सुरू करणे तुमच्यासाठी फलदायी ठरेल. या राशीच्या लोकांची आर्थिक परिस्थिती आज अत्यंत सुखद असेल. बाहेर फिरण्यासाठी जाण्याचा बेत आखाल. खर्चावर नियंत्रण

**तुळ**
समाधान वाढेल. तुमच्या वैयक्तिक आयुष्यातील जबाबदारी वाढू शकते. आज तुमचा दिवस संमिश्र जाईल. आज कोणताही निर्णय घेण्यापूर्वी कुटुंबातील सदस्यांचे मत अवश्य घ्या.

**वृश्चिक**
वैवाहिक जीवनात आनंद दिसून येईल. स्थिती देखील मजबूत होईल. ऑफिसमध्ये जास्त कामामुळे तुमच्या प्रवास करण्याचा बेत रद्द होईल.

**धनु**
ठेवा.वैयक्तिक आयुष्यातील जबाबदारी वाढू शकते. दिवस संमिश्र जाईल. आज कोणताही निर्णय घेण्यापूर्वी कुटुंबातील सदस्यांचे मत अवश्य घ्या. काही काम करण्याची उत्सुकता वाढेल.

**मकर**
उत्साहवर्धक काम करण्याची उत्सुकता वाढेल. आज तुमचे आरोग्य चांगले राहील, तुम्ही उर्जेने परिपूर्ण असाल. सरकारी नोकऱ्या असलेल्या लोकांना प्रमोशनशी संबंधित बातमी मिळेल.

**कुंभ**
परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी त्यांच्या गंतव्यस्थानापर्यंत पोहोचण्यात यशस्वी होतील. सन्मान होईल. रक्तदाबाच्या रुग्णांनी काळजी घ्यावी.

**मीन**
आज तुमचे आरोग्य चांगले राहील, तुम्ही उर्जेने परिपूर्ण असाल. सरकारी नोकऱ्या असलेल्या लोकांना लवकरच प्रमोशनशी संबंधित चांगली बातमी मिळेल. प्रत्येक टप्प्यावर मित्रांकडून सहकार्य मिळेल.

# भिवंडीत बालमजूर ?

## कंपनी मालकावर गुन्हा दाखल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यात पोलिसांनी एका ४९ वर्षीय व्यक्तीविरुद्ध त्याच्या कंपनीच्या आवारात मुलांना कामावर ठेवल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. एका अधिकाऱ्याने रविवारी ही माहिती दिली. भिवंडी परिसरातील वेहळे गावात 'पॅकेजिंग कंपनी' चालवणाऱ्या एका व्यक्तीच्या चार दुकानांवर कामगार, महिला व बालकल्याण विभाग आणि स्थानिक

**पोलिसांनी शुकवारी छापा टाकला.**

नारपोली पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्याने सांगितले की, छापा टाकणाऱ्या पथकाला आठ अल्पवयीन मुली आणि एक अल्पवयीन मुलगा आवारात इलेक्ट्रॉनिक वस्तू पॅक करताना आढळले. ते म्हणाले की कंपनी मालकाविरुद्ध बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) कायद्याच्या तरतुदीनुसार एफआयआर दाखल करण्यात अला आहे.

# स्मार्ट प्रकल्पातंर्गत ठाणे जिल्ह्याचे खरेदीदार विक्रेता संमेलन संपन्न

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
☐ प्रतिनिधी

आज दिनांक २०/१२/२०२४ रोजी ठाणे जिल्ह्याचे खरेदीदार विक्रेता संमेलन, द्वारका हॉटेल, वागळे इस्टेट ठाणे, येथे संपन्न झाले, स्मार्ट प्रकल्पातंर्गत मान्यता प्राप्त ठाणे जिल्ह्यातील ५ समुदाय आधारित संस्था व ठाणे जिल्ह्यातील ८ खरेदीदार यांनी सहभाग घेतला.

सदर संमेलनास मा.श्री रामेश्वर पाचे, प्रकल्प संचालक आत्मा जिल्हा अंमलबजावणी कक्ष ठाणे, यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना करून मार्गदर्शन केल. मा. श्री. भीमाशंकर पाटील नोडल अधिकारी RIU ठाणे यांनी स्मार्ट प्रकल्पाचे सादरीकरण व कंपनी सध्यस्थिती बद्दल माहिती दिली श्रीम. शिल्पा निखाडे नोडल अधिकारी ठाणे, यांनी जिल्हातील समुदाय आधारित संस्थेचा व खरेदीदार यांचा परिचय करून दिला, श्रीम. मनाली तांबडे कृषी उपसंचालक ठाणे यांनी मार्गदर्शन केले, श्री राजेश खिरारी अर्थतज्ञ तथा वित्त प्रवेश सल्लागार ३ध्ळ ठाणे व श्री. राजाराम निशानदार लेखापाल ठाणे यांनी विक्रेते व खरेदीदार यांच्यात् करार करण्यास मार्गदर्शन केले, त्यावेळी खरेदीदार KB एक्स्पोर्ट यांच्यासोबत जिल्हातील तीन समुदाय आधारित संस्थेचे श्ध्ळ करण्यात आले.

सदर कार्यक्रमास श्री.सागर फाटक (CS पुणे) श्री. प्रकाश कक्कर KB Export Proprietor, श्री.गुरुनाथ हलपतराव - के बी एक्स्पोर्ट, श्री. अक्षय काकडे- ॲमेझॉन फ्रेश इं. लि, श्री. राजवर्धन कदम - MSAMB पुणे, श्री. किशोर शिंदे - सिंजेन्टा फॉउंडेशन, श्री. महावीर भीष्णोई - गोदरेज ॲग्रोवेट लि. मुंबई, श्री. विठ्ठल बडदे - कृषी उ. बा. समिती नवी मुंबई भाजीपाला संघ हे खरेदीदार तसेच जिल्हातील मंजूर उपप्रकल्पाचे CBO प्रतिनिधी, पालघर जिल्हातील एक CBO व विभागीय अंमलबजावणी कक्ष ठाणे येथील स्टाफ उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. अर्चना नागरगोजे पुरवठा व मूल्य साखळी तज्ञ DIU ठाणे यांनी आभार व समारोप केला.

# जन गण मन विद्यामंदिर आणि ज्युनिअर कॉलेजचे स्नेहसंमेलन साजरे

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली-** काल दिनांक २०/१२/२४ रोजी संध्याकाळी ५.०० वा जेएम एफ संस्थेच्या ब्रम्हा रंगतालय मध्ये जनगणमन विद्यामंदिर आणि ज्युनिअर कॉलेज आठवा स्नेहसंमेलन कार्यक्रम धुमधडाक्यात साजरा झाला. संपूर्ण कार्यक्रम हा रंगारंग होता. या कार्यक्रमात जवळजवळ १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यात गायन, वादन, नाटक,सामूहिक नृत्य, महाराष्ट्राची संस्कृती आणि फॅशन शो अशा भरघोस कार्यक्रमांचा समावेश होता. प्रेक्षकांचाही प्रचंड प्रतिसाद लाभला.

सदर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून विष्णूनगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मा.श्री.संजय पवार साहेब, रेगे दिक्षित सायन्स अकॅडमीचे श्री.शैलेश रेगे सर, स्टडी बझ अकॅडमीचे श्री.कैलास चव्हाण सर, मा.श्री.भोजराज सर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते नटराज व सरस्वती पूजन आणि दीप प्रज्वलनाने होऊन स्वागत गीत व गणेश वंदन सादर करण्यात आले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सन्मा.डॉ.राजकुमार कोल्हे सचिव व प्राचार्या डॉ.सौ.प्रेरणा राजकुमार कोल्हे कोषाध्यक्षा कु. जाह्णवी राजकुमार कोल्हे. प्रभारी प्राचार्य




श्री.अल्पेश खोब्रागडे सर उपप्राचार्य श्री. एकनाथ चौधरी सर विद्यामंदिरचे प्रभारी मुख्याध्यापक श्री. अमोद वैद्य सर उपमुख्याध्यापिका तेजावती कोटियन मॅडम आणि संपूर्ण शिक्षक व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.डॉ.प्रेरणा मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हटले की, प्रत्येकाच्या आयुष्यामध्ये करिअर खूप महत्त्वाचे आहे. शिक्षण घेत असतांना आपल्या करिअर कडे लक्ष देणे गरजेचे आहे.डॉ.राजकुमार कोल्हे यांनी सांगितले की, आयुष्याचा आनंद घेतांना आपली कर्तव्य लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे. आकांक्षांची उंची गाठायची असेल तर नेहमी मेहनत करण्याची तयारी पाहिजे. व.पो.नि.संजय पवार यांनीही विद्यार्थ्यांना थोडक्यात मार्गदर्शन केले. विशेष बाब म्हणजे कल्याण डोंबिवली जिल्हा स्तरावर प्रविण्य मिळविणारे कनिष्ठ महाविद्यालयाचे खेळाडू मानसी बोन्डे- बुद्धिबळ तृतीय, अथर्व सोनार-धावणे, लांब उडी द्वितीय आणि रिले प्रथम, रोहण नाईक- लांब उडी तृतीय, रिले प्रथम,श्रवण सोहनी रिले प्रथम, यश उपासणी रिले प्रथम, अनमोल मेस्त्री रिले प्रथम, गिरीश पवार कॅरम प्रथम, आयुष घाडी कॅरम सहावा आणि ध्रुव शिरसाठ तलवारबाजी मध्ये द्वितीय यांचा सत्कार करण्यात आला. शुभम सनिता आणि रुपाली निषाद हे २०२४-२५ चे उत्कृष्ट विद्यार्थी म्हणजेच मिस्टर आणि मिस जन गण मन ज्युनिअर कॉलेज आणि उत्कृष्ट खेळाडू म्हणून स्मित चव्हाण व शिरिया गुप्ता यांना सन्मानित करण्यात आले.आभार प्रदर्शन सौ.निहारिका डायस यांनी व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.एन्जल उपाध्याय व कु.सान्वी वालणकर या विद्यार्थिनींनी केले.

कार्यक्रमात सर्व शिक्षकांनी यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतल्याचे दिसून आले.कार्यक्रमाची सांगता वंदे मातरमने करण्यात आली.

# खासगी वाहनावर अंबर दिव्याचा अवैध वापर

## शुक्लाची कार जप्त

## कल्याण आरटीओने ठोठावला दंड



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
☐ प्रतिनिधी

**ठाणे :** कल्याण पश्चिमेतील हायप्रोफाईल आजमेरा सोसायटीत राहणाऱ्या मराठी कुटुंबावर बाहेरचे गुंड बोलवून जीवघेणा हल्ला करणाऱ्या अखिलेश शुक्ला यांच्या पत्नी गीतासह आणखी दोघांना खडकपाडा पोलिसांनी अटक केली आहे. खळबळजनक बाब म्हणजे मुख्य आरोपी शुक्ला यांच्याकडं कोणताही अधिकार नसताना त्यांनी स्वतःच्या खासगी वाहनावर शासकीय अंबर दिवा वापरल्यामुळं त्यांची कार जप्त करण्यात आली. तसंच कल्याण आरटीओने आरोपी शुक्ला यांच्या वाहनावर नऊ हजार पाचशे रुपयांचा दंड आकारण्यात आल्याची माहिती, कल्याण विभागाचे आरटीओ आशुतोष बारकुल यांनी दिली आहे.

एम एच ०५ / बी एस/५९९४ क्रमांकाची अखिलेश शुक्ला याच्या मालकीची कार असून या कारचा विमा संपला आहे. शिवाय पीयुसी देखिल संपले असताना गेल्या चार वर्षांपासून तो स्वतःच्या खासगी वाहनावर महाराष्ट्र शासनाचे स्टीकर लावून फिरत होता. कारच्या आतल्या बाजूस अंबर दिवा ठेवण्यात येत होता. अंबर दिव्याचा वापर कुणी करावा आणि करू नये याचे केंद्रीय परिवहन विभागाचे नियम आहेत. या नियमांचे उल्लंघन पर्यटन विकास महामंडळातील शासकीय अधिकारी शुक्ला याने केले आहे.

मराठी विरुद्ध उत्तरभारतीय वादाचा मुद्दा उफाळून आल्यानंतर या घटनेची शासनाने गंभीर नोंद घेतली आहे. कल्याणचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल यांच्या मार्गदर्शनाखाली मोटार वाहन निरीक्षक रोहित पवार आणि प्रियंका टपले यांच्या पथकाने आरोपी अखिलेश शुक्लाच्या खासगी वाहनासह त्या वाहनातील अंबर दिव्यावर जप्तीची कारवाई केली.

केंद्रीय मोटार वाहन कायद्याप्रमाणे अंबर दिवा कुणी लावावा आणि कोणी लावू याचे निर्देश आहेत. या निर्देशांचे उल्लंघन शासकीय अधिकारी अखिलेश शुक्ला याने केले आहे. त्याच्या वाहनाचा विमा आणि पीयुसी चार वर्षांपूर्वीच संपले आहे. हे वाहन नियमाबाह्य पध्दतीने रस्त्यावर वापरले जात होते.



> आरोपी शुक्ला यांच्याकडं कोणताही अधिकार नसताना त्यांनी स्वतःच्या खासगी वाहनावर शासकीय अंबर दिवा वापरल्यामुळं त्यांची कार जप्त करण्यात आली. तसंच कल्याण आरटीओने आरोपी शुक्ला यांच्या वाहनावर नऊ हजार पाचशे रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. शिवाय या कारचा विमा संपला आहे. शिवाय पीयुसी देखिल संपले असताना गेल्या चार वर्षांपासून तो स्वतःच्या खासगी वाहनावर महाराष्ट्र शासनाचे स्टीकर लावून फिरत होता.
>
> ❍ आशुतोष बारकुल
> आरटीओ; कल्याण

याबद्दल अखिलेश शुक्ला याला ९ हजार ५०० रूपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. त्याचे खासगी वाहन अंबर दिव्यासह जप्त करण्यात असून खडकपाडा पोलिस ठाण्यात जमा करण्यात आले असल्याचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल यांनी सांगितले.

**संपत्तीची चौकशी**

एमटीडीसी विभागात अधिकारी पदावर काम करणाऱ्या शुक्लाची संपत्ती प्रमाणाहून अधिक असल्याचा आरोप करत त्याची चौकशी केली जावी, अशी मागणीही स्थानिक रहिवाशांनी केली आहे. तसेच देशमुख कुटुंबीयांवरील गुन्हा मागे घेण्याचीही मागणी केली जात आहे.

# कल्याण पूर्वेतील समस्यांना हिवाळी अधिवेशनात वाचा




**नागरिकांच्या हक्कांसाठी आणि विकासासाठी कायम सज्ज नेतृत्व! कल्याण पूर्वेच्या विकासासाठी आमदार सौ. सुलभाताई गणपत गायकवाड यांची शासनाकडे हिवाळी अधिवेशनात ठोस मागणी**

**आमदार सुलभा गायकवाड यांनी अधिवेशनात वाचला मतदारसंघातील मूलभूत समस्यांचा पाढा**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**नागपूर ☐ प्रतिनिधी**

हिवाळी अधिवेशनात आमदार सौ. सुलभाताई गणपत गायकवाड यांनी कल्याण पूर्व मतदारसंघातील नागरी समस्यांवर आणि विकास प्रकल्पांवर लक्ष वेधत महत्त्वपूर्ण प्रश्न उपस्थित केले.

**यू-टाईप रस्त्याचे काम व प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन**

कल्याण पूर्व भागातील तिसगांव नाका ते सिद्धार्थ नगर ते काटेमानिवली नाका यू-टाईप रस्ता रुंदीकरण हा परिसरातील नागरिकांसाठी महत्त्वाचा आहे. या रस्त्याचे रुंदीकरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे आणि यातील बाधित प्रकल्पग्रस्तांचे योग्य पुनर्वसन सुनिश्चित करण्यासाठी शासनाने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी त्यांनी केली.

**पाणीपुरवठ्यासाठी भरीव तरतूद**

मतदारसंघातील वाढत्या लोकसंख्येच्या गरजा ओळखून पाणीपुरवठा व्यवस्था सुधारण्यासाठी तातडीने निधी उपलब्ध करावा. मोठ्या पाण्याच्या टाक्या उभारणे आणि नवीन पाईपलाइन बसवण्यासाठी भरीव तरतूद करण्यात यावी, अशी आग्रहाची विनंती त्यांनी केली.

**क्रीडा संकुल उभारणी**

मतदारसंघातील युवकांसाठी उत्कृष्ट क्रीडा सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी १०० फुटी रोड येथील आरक्षित भूखंडावर लवकरात लवकर क्रीडा संकुल उभारले जावे. या प्रकल्पासाठी तातडीने निधीची तरतूद करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी अधिवेशनात केली.

**कल्याण पूर्वेच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्धता**

नागरिकांच्या अपेक्षा आणि विकासाच्या गरजांची जाणीव ठेवून, सौ. सुलभाताई गायकवाड यांनी शासनाकडे तातडीने कारवाईची मागणी केली आहे. मतदारसंघातील प्रत्येक नागरी सुविधेचा दर्जा उंचावण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्नशील राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

# क्रीडा स्पर्धातून उद्याचे खेळाडू घडतील

## - रा.जि.प माजी अध्यक्षा नीलिमाताई पाटील

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**

**पेण (प्रतिनिधी) :** शालेय जीवनातील क्रीडा स्पर्धांमधून उद्याचे खेळाडू घडतील असे महत्त्वपूर्ण प्रतिपादन रायगड जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. नीलिमाताई पाटील यांनी आराव येथे गागोदे केंद्राच्या वतीने आयोजित क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धांच्या प्रसंगी केले.




निलिमा ताई पाटील पुढे म्हणाल्या की, वर्षभर अभ्यास करून विद्यार्थ्यांना काहीतरी बदल हवा असतो.प्रत्येक विद्यार्थ्याकडे उपजत कला व क्रीडा गुण असतात त्यांना अशा स्पर्धांमधून चालना मिळते व आवडही निर्माण होते. अशा स्पर्धांमधूनच एखादा विद्यार्थी अभिनव बिंद्रा, पी टी उषा म्हणून उदयाला येऊ शकते. दोन दिवस चालणाऱ्या या स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थी, शिक्षक व पालकांच्या भोजनाची व्यवस्था वाकरुळ ग्रामपंचायतचे सरपंच गणेश गायकर, गागोदे येथील सामाजिक कार्यकर्ते उमेश पवार व आराव ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच सौ. सुचिताताई शेलार यांनी भोजनासोबतच गोड मिठाई व अल्पोपहाराची व्यवस्था केली होती. त्यांचे कौतुक करताना सौ.नीलिमाताई पाटील म्हणाल्या की, पेण पूर्व विभागात नेहमीच दातृत्व पाहायला मिळते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी काही उपक्रम आयोजित केल्यास समाजाचा नेहमीच पाठिंबा मिळतो असेही त्या म्हणाल्या. यावेळी गागोदे केंद्राचे केंद्रप्रमुख दत्तात्रय कोठेकर, शेडाशी ग्रामपंचायतचे माजी सरपंच सचिन सावंत, पोलीस पाटील देवजी भोसले, केंद्रीय शिक्षण सल्लागार समितीचे अध्यक्ष दत्ताराम सावंत, ग्रामसेविका तृप्ती पुगावकर आदी मान्यवर उपस्थित होते. तर परीक्षणाचे काम सुजित नागे, छाया पाटील, नलिनी मोकल, ज्ञानेश्वर पवार यांनी पार पाडले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामकृष्ण भोईर यांनी केले.

याप्रसंगी ध्वनिक्षेपकाची उत्तम व्यवस्था तुकाराम भोसले यांनी केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

# कल्याण - मुरबाड राष्ट्रीय महामार्गावर वर्षभरात ५८ अपघात; तर ३६ मृत्यूंची नोंद








**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
☐ **बाळासाहेब भालेराव**

-------------------------

**मुरबाड दि.२२:** मुरबाड-कल्याण नगर या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ वरील म्हारळ ते माळशेज घाट महामार्गावर गेली वर्षभरात विविध प्रकारचे जवळपास ५८ अपघात झाल्याच्या घटना घडल्या आहेत त्यामध्ये ३६ जणांचा मृत्यू झाला आहे तर ५८ जण गंभीर जखमी झाल्याची माहिती राष्ट्रीय महामार्ग पोलिस केंद्र मुरबाड- माळशेज घाटचे सहायक पोलिस निरीक्षक अनिल विसपुते यांनी दिली आहे.

> **म्हारळ ते माळशेज घाटापर्यंत वाहतूक पोलीस चांगली भूमिका बजावून रस्त्यावर घडलेल्या अपघातग्रस्तांना चांगली मदत करतात. तसेच घाट रस्त्याच्या बाजूच्या गावाकडीची माणसेही मृत्युंजय देवदूत म्हणून काम करत आहेत.**
>
> ❐ अनिल विसपुते सहायक पोलीस निरीक्षक
> राष्ट्रीय महामार्ग पोलीस केंद्र माळशेज घाट मुरबाड

**सन २०२४ मध्ये**
**एकूण अपघात-५८**
**एकूण मयत -३६,**
**एकूण जखमी-. ५८**

या घटनेची माहिती मिळताच मुरबाड-माळशेज महामार्ग केंद्र येथील पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी येऊन अपघात यांची माहिती घेऊन त्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्याची भूमिका महामार्गावरील पोलिस बजवत आहेत त्यामुळे सध्या देवदूत म्हणून या राष्ट्रीय महामार्गावरील पोलिस काम करत असल्याच्या प्रतिक्रिया वाहनचालक व नागरिकांनी दिली आहे. यामध्ये पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र ठाकूर, चंद्रकांत भोये, पोलीस हवालदार राजेंद्र रसाळ, संजय घुडे, प्रवीण गायकवाड, तसेच पोलीस शिपाई मध्ये कैलास कोकाटे, खंडेराव आव्हाड, शरद पाखरे, पोलीस हवालदार अमोल पाटील यांच्यासह इतर पोलीस अंमलदार हे सुद्धा सर्वत्र म्हारळ ते माळशेज घाट पर्यंत सतर्क म्हणून काम करत आहे. तसेच जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२४ दरम्यान घडलेल्या अपघाताची माहिती मुरबाड माळशेज घाट पोलिसांनी दिली आहे.

महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त
जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
कौशल्य विकास केंद्र, गोवेली, म्हसा व खर्डी
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु ! प्रवेश सुरु ! प्रवेश सुरु !
१) बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं. ३०४२०२) — कालावधी १ वर्ष
२) पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं. २०१२३०) — कालावधी १ वर्ष
३) जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट(GNMA) (कोड नं. २०१२३७) — कालावधी १ वर्ष
४) डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं. २०१४०४) — कालावधी २ वर्ष
५) सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिंजन प्रशिक्षण (कोड नं. ४११२४) — कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
CALL: 8108559566 / 9158518832 / 9619188558
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे

# कल्पेश ठाकूर, अरविंद गुरव यांचा कोकण सन्मान पुरस्काराने गौरव

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण (प्रतिनिधी)** समाज कार्यात अग्रेसर असणाऱ्या आणि प्रामुख्याने कोकणातील तरुणांनी मुंबई येथे स्थाईक होऊन मागील २५ वर्षांपूर्वी 'कोकण कट्टा' या सेवाभावी संस्थेचे बिज रोवणाऱ्या संस्थेतर्फे आज विलेपार्ले मुंबई येथील पंडित दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहात मुंबई गोवा महामार्गावरील अपघात ग्रस्तांचे मदतगार कल्पेश ठाकूर, पत्रकार अरविंद गुरवसह पाच जणांना कोकण सन्मान पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर बोरीवली विधानसभा आमदार संजय उपाध्याय, कुपर रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.सुधीर मेढेकर, सिने अभिनेता दिगंबर नाईक, दिलीप मुळे, संदीप दळवी, कोकण कट्टाचे अध्यक्ष अजित पितळे, गायक सुदेश भोसळे, श्रीकांत नारायण, नितीन कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार संजय उपाध्याय यांनी सांगितले की, कोकण कट्टा चे २५ वर्षात रोपाच रूपांतर वटवृक्षात झाले आहे. ही संस्था गेली २५ वर्षे पार्ले, बोरीवली, मुंबई, नवी मुंबई, रायगड आणि कोकण या भागात विविध प्रकारे समाजिक चळवळ राबवून करत आहे. गरीब, दुर्बल आणि अनाथ घटकांना नेहमीच मदतीचा हात ते देत असतात. यावेळी झालेल्या कोकण सन्मान सोहळयात मुंबई गोवा महामार्गावर अपघातग्रस्तांचे मदतगार, पेणचे देवदूत कल्पेश ठाकूर, पत्रकार अरविंद गुरव, मास्टर्स क्लासेसचे गौरव सावे, अथर्व ग्रुपचे उद्योजक सचिन गुंजाळ, दंतचिकित्सक डॉ.रोहित कर्णिक. सिने अभिनेते दिगंबर नाईक, करुणेश्वर वृद्धाश्रमाचे समाजेवक इश्वर ढोरे यांना मानचिन्ह, शाल, पुष्पगुच्छ व परशुरामाची मूर्ती देऊन कोकण सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी प्रसिद्ध गायक सुदेश भोसले आणि श्रीकांत नारायण यांच्या 'सुरश्री' गायनाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

# आयुष्यमान संपल्याने मुंबई -वलसाड फास्ट पॅसेंजर संपुष्टात येणार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**बोईसर :** मुंबई -वलसाड फास्ट पॅसेंजर गाडीचे आयुष्यमान संपत आल्याने तिचा प्रवास लवकरच संपुष्टात येणार आहे. यामुळे विरार-वैतरणा दरम्यान दैनंदिन प्रवास करणाऱ्या सात ते आठ हजार प्रवाशांच्या सुरू असलेल्या हालात आणखी भर पडणार आहे. मुंबई -वलसाड फास्ट पॅसेंजर ही गाडी १८ डब्यांची आहे. त्यात ११ डबलडेकरचे डबे आहेत. सर्वसाधारणपणे १३६ आसन क्षमता असणाऱ्या एका डब्यामधून २५० ते ३०० प्रवासी सहज प्रवास करत असतात. सुमारे १० हजार दैनंदिन प्रवासी संख्या असलेली ही डबलडेकर गाडी नोकरदारवर्ग, विद्यार्थी, व्यावसायिक, व्यापारी आदींसाठी लाभदायक आहे. सकाळी वलसाड आणि संध्याकाळी मुंबई सेंट्रलवरून सुटते. सुमारे २० स्थानके असलेली ही गाडी पूर्वीच्या काळी १३ अप/१४ डाऊन व नंतर ०९०२३ अप/०९०२४ डाऊन म्हणून ओळखली जाते. या गाडीचा १३ जुलै १९९३ पासूनचा प्रवास मुंबई सेंट्रल ते वलसाड दरम्यान मर्यादित करण्यात आला आहे. ही गाडी मुंबई येथे दैनंदिन कामकाजासाठी जाणाऱ्या अप-डाऊन पासधारकांसाठी अत्यंत सोयीची असल्याने उंबरगावपासून वैतरणा-विरारपर्यंतचे हजारो प्रवासी या गाडीचा प्रामुख्याने वापर करीत आहेत. त्यामुळे या भागातील दैनंदिन प्रवाशांसाठी ती जीवनवाहिनी ठरली आहे.



# मुरबाड स्टेट बँक मार्फत शेतकरी दिवस साजरा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
□ **प्रतिनिधी**

**मुरबाड दि.२२-** मुरबाड-कल्याण या राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या स्टेट बँक मुरबाड येथे बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थित मध्ये शेतकरी हा देशाचा कणा आहे शेतकरी आहे म्हणून देश आहे आपण आहोत ही जाणीव ठेवून देशामध्ये शेतकरी दिन साजरा केला जातो अशाच प्रकारे मुरबाड तालुक्यात भारतीय स्टेट बँकेतर्फे विविध उपक्रमाने व मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा दिन मोठ्या थाटात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात स्टेट बँकेचे आरएम राजेंद्र धिंग्रा, ए जी एम ममता मोहपाता,सीएम हिना कॉंट्रोज,ॐभी विवेक कुमार, मुरबाड शाखा प्रमुख तुषार चव्हाण, प्राजक्ता पवार उपस्थित होते. या कार्यक्रमात शेतकयांसाठी विविध योजना संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. या मध्ये अनेक कृषी सुविधांबद्दल आणि योजना बद्दल माहिती देण्यात आली (Agri Alied Activities, PMPME Agri wearshow Agri Stronge, Agri Refrigeration )२० सारख्या विविध योजनांची माहिती देण्यात आली आदिवासी आश्रम शाळा सासणे यां मध्ये सिएसआर (ण्ऐं) फंडामधून मधुन शाळेसाठी संगणक लॅब देण्यात आले संगणक लॅबचे उद्‌घाटन राजेंद्र धिंग्रा यांचे हास्ते उद्‌घाटन करण्यात आले. तसेच मुरबाड येथे शेतकऱ्यांना स्टेट बँक (एसबीआय )बँक तर्फे शेतकऱ्यांसाठी उपलब्ध असणाऱ्या योजनांची माहिती दिली तसेच शेती कर्ज घेतलेल्या सर्व शेतकरी यांचे मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला या कार्यक्रमासाठी मुरबा तालुक्यातील अनेक शेतकरी खातेधारक व नागरिक उपस्थित होते.

# कल्याणमध्ये भाजपच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यावर प्राणघातक हल्ला

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
□ **प्रतिनिधी**

**कल्याण :** येथील पश्चिमेतील पारनाका भागात शुक्रवारी रात्री बारा वाजताच्या दरम्यान भाजपच्या एका ६४ वर्षाच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यावर दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात इसमांनी प्राणघातक हल्ला केला. लाथाबुक्की, पेव्हर ब्लॉकने मारहाण झाल्याने ज्येष्ठ कार्यकर्ता गंभीर जखमी झाले आहेत. हेमंत रघुनाथ परांजपे असे प्राणघातक हल्ला झालेल्या कार्यकर्त्याचे नाव आहे. ते सेवानिवृत्त आहेत. ते कल्याणमधील भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते आहेत. या मारहाणीवरून भाजप कल्याण विभागाच्या कार्यकर्त्यांनी तीव्र संताप व्यक्त करत हल्लेखोरांना तात्काळ अटक करण्याची मागणी केली आहे. हेमंत परांजपे यांनी बाजारपेठ पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे, शुक्रवारी रात्री आपण महेश जाधव यांच्या नातेवाईकाच्या लग्नाला गेलो होतो. तेथून प्रशांत देशमुख यांनी त्यांच्या मोटारीने आपणास दोन जणांना आपल्याला पारनाका येथील घरी सोडण्यास सांगितले. शुक्रवारी रात्री बारा वाजण्याच्या सुमारास आपण घराजवळ उतरलो. घराजवळ उभा असताना अचानक दोन व्यक्ति तेथे स्कुटरवर आल्या. त्यांचे चेहरे रुमालाने झाकले होते. दोन्ही अज्ञात इसमांनी आपणास, 'काय रे लय माजलास काय. आमच्या दादाला शिव्या देतो काय. काही पण बोलतोस काय,' असे बोलून दोघांनी आपणास शिवीगाळ करत ठोशाबुक्क्यांनी मारहाण करत जमिनीवर पाडले. लाथाबुक्क्यांनी मारहाण करत आपल्या पायावर सिमेंटचे पेव्हर ब्लॉक मारून पायाला दुखापत केली. यावेळी आपण बचावासाठी आपण वाचवा वाचवा ओरडल्याने मारेकरी तेथून पळून गेले. हे दोन्ही मारेकरी २५ ते ३० वयोगटातील होते. हेमंत परांजपे यांनी बाजारपेठ पोलीस ठाण्यात जाऊन या मारहाण प्रकरणी तक्रार केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला आहे. याप्रकरणातील आरोपींची सीसीटीव्ही चित्रणातून ओळख पटवून त्यांना १२ तासाच्या अटक करावी. अन्यथा भाजपतर्फे उग्र आंदोलनाचा केले जाईल, असा इशारा देण्यात अला आहे

# प्रकल्पासाठी जमीन संपादन करत दुटप्पी धोरण नको आदिवासींना न्याय हक्क मिळवून द्या

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**पालघर □ ऋषीकेश जाधव**

नागपूर येथे सुरू असलेल्या विधानसभा २०२४ च्या, हिवाळी अधिवेशनात दिनांक २१ डिसेंबर रोजी सकाळच्या अधिवेशन काळात औचित्याचे प्रश्न विचारताना मा. श्री. राजेंद्र गावीत - माजी खासदार तथा आजी पालघर विधानसभा आमदार यांनी, मा.श्री.पीठासीन-अध्यक्ष महोदय यांनी, पालघर जिल्यातील भूसंपादन होत असताना आदिवासींवर बांधवावर स्थानिक प्रशासनाकडून होणाऱ्या अत्याचारा बाबत प्रश्न उपस्थित करून सांगितले .

मुंबई- अहमदाबाद हायवे, मुंबई -वडोदरा एक्सप्रेस रोड, बुलेट ट्रेन लोहमार्ग, स्टेस्टाईल पार्क, विरार जेटी, रेल्वे चौपदरीकरण, वाढवण बंदर आदी प्रकल्प यांना स्थानिक जनता सकारात्मक प्रतिसाद देत असताना सुध्दा. आदिवासी बांधवांनच्या जमीन संपादन करतांना, दुपट्टी धोरण अवलंबिले जात आहे. धनदांडग्यांच्या जमीनदार ,दलाल यांना दामदुप्पट मोबदला मिळत आहे. हे सत्य नाकारले जाऊ शकत नाही. परंतु आदिवासी यांच्या वर अन्याय का?




## आमदार राजेंद्र गावीत यांची विधानसभेत मागणी

पालघर जिल्ह्यातील मुंबई - वडोदरा हा दृतगती महामार्ग तलासरी तालुक्यातील कोचाई - बोरमाळ ग्रुप ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातून जात असून या क्षेत्रात प्रकल्पासाठी आदिवासी कुटुंबाच्या जमिनी संपादित होत आहेत. या जमिनीवर आदिवासींच्या, दोन - तीन पिढ्यांन पासून कब्जेदारी व वाहीवाटी आहेत. ते सदर जमिनी कसत असून त्यांच्या वर त्यांचे सर्व कुटुंब अवलंबून असल्याने या जमिनी विनामोबदला हिसकावून घेतल्याने ही कुटुंबे बेघर व भूमिहीन झाली आहेत. या जमिनीच्या मोबदल्याकरिता जिल्हाधिकारी पालघर व उपविभागीय अधिकारी तथा सक्षम प्राधिकारी यांचेकडे. सदर आदिवासी सन २०१८ पासून हे आदिवासी पत्रव्यवहार करीत आहेत. असे असताना ही दिनांक २ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११-३० चे दरम्यान उपविभागीय पोलिस अधिकारी, पोलिस निरीक्षक तलासरी व महसूल अधिकारी यांनी. पोलिस फौजफाटा घेवून आदिवासी पीडित कुटुंबाची घरेदारे जेसीबी च्या साहाय्याने तोडून जमीन सपाट केली. संपादित झालेल्या जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी वारंवार उपविभागीय अधिकारी डहाणू यांच्याकडे प्रत्यक्ष भेटून व पत्रव्यवहार करूनही मोबदला न मिळाल्याने लखमी प्रसूत बरफ या महिलेने कंटाळून आत्महत्या केली. ही आत्महत्या करण्यास या अधिकाऱ्यांनी भाग पाडले.असे स्थानिक आदिवासीं यांचे म्हणणे आहे. या आंदोलनात विशेषतः महिलांना मारहाण करत फरफटत नेवून पोलिस व्हॅन मध्ये कोंबून,नंतर पोलिस ठाण्यात अनेक तास बसविण्यात आले. या अन्यायकारक घटनेची सखोल चौकशी करून. या घटनेला जबाबदार असलेल्या, उपविभागीय अधिकारी डहाणू सह संबंधित कारवाई करणारे पोलिस अधिकारी, कर्मचारी, भूसंपादन अधिकारी, काम करणारे ठेकेदार यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून या आदिवासींना न्याय मिळवून द्यावा अशी या औचित्याच्या मुद्द्याद्वारे शासनाकडे मागणी करत आहे.

# कल्याण-मुरबाड रस्तारुंदीकरण बाधितांना मिळणार मोबदला! राम सुरोशी यांनी घेतली आमदार किसन कथोरे यांची भेट

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

कल्याण मुरबाड (NH 61) राष्ट्रीय महामर्गाचे काम सध्या जलद गतीने सुरु असुन यात रस्ता रुंदीकरणात बाधित होणारे शेतकरी,व्यावसायिक, रहिवाशी यांचं नुकसान होणार असुन सर्व बाधितांना योग्य मोहबदला मिळावा म्हणुन अनेक वेळा शेतकरी व्यावसायिक, रहिवाशी यांनी संबंधिय अधिकार, ठेकेदार यांच्याशी चर्चा करून बैठका आयोजित केल्या गेल्या रस्त्यात बाधित होणाऱ्या सर्व क्षेत्राचे सर्व्हे पूर्ण करून मोहबदला दिला जाणार असल्याचे बोलले गेले होते परंतु सर्व्हे पूर्ण होऊन अनेक महिने झाले तरी बाधितांना कुठल्याही प्रकारचा मोहबदला देण्यात आला नाही रस्त्याचे काम पूर्ण करण्यासाठी ठेकेदार व संबंधित अधिकारी वर्गाची लगबघ चालु आहे. यामुळे रस्त्यात बाधित होणाऱ्या शेतकरी, व्यावसायिक, रहिवाशी संभ्रमात असुन मोहबदला लवकरात लवकर देण्याची मागणी जोर धरू लागली आहे, बाधिनांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष राम सुरोशी यांनी आमदार किसन कथोरे यांची भेट घेतली असता आपण शेतकरी, व्यावसायिक, रहिवाशी यांच्या पाठीशी असुन सर्व बाधितांना मोहबदला मिळवा यासाठी लवकरच बाधितांची व अधिकारी वर्गाची मिटिंग लावून प्रश्न निकाली काढणार असल्याचे सांगितले आहे








# कल्याण आयमेथॉनमध्ये सात हजारांहून अधिक धावपटूंचा सहभाग

## आफ्रिका खंडातील १२ खेळाडूंचा समावेश

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** अवघ्या पाच वर्षांमध्ये आपल्या उत्कृष्ट आयोजन - नियोजनामुळे महाराष्ट्रातच नव्हे तर विदेशातील धावपटूंमध्ये प्रसिद्ध झालेली इंडीयन मेडीकल असोसिएशनची यंदाची आयमेथॉन रेकॉर्डब्रेक ठरली. आयएमए कल्याण, कल्याण रनर्स ग्रुप आणि केडीएमसीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित यावर्षीच्या आयमेथॉन ५ मध्ये तब्बल ७ हजारांहून अधिक धावपटूंनी सहभाग घेत कल्याण डोंबिवलीत नवा इतिहास रचला.

केडीएमसीच्या आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड, डीसीपी अतुल झेंडे, केडीएमसी उपायुक्त संजय जाधव, महाराष्ट्र आयएमए अध्यक्ष डॉ. संतोष कदम, कल्याण आयएमए अध्यक्षा डॉ. सुरेखा ईटकर, शिक्षणतज्ज्ञ बिपिन पोटे, डॉ. आश्विन कक्कर, सुनिल चव्हाण, अमित सोनावणे, विकास जैन, डी.बी.जाधव, आयएमए कल्याणचे विकास सुरंजे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत या आयमेथॉनला झेंडा दाखवून प्रारंभ केला.

कल्याण पश्चिमेतील दुर्गाडी चौकातून सुरू झालेली ही आयमेथॉन २१ किलोमीटर, १० किलोमीटर, ५ किलोमीटर आणि ३ किलोमीटर अशा चार गटांमध्ये आयोजित करण्यात आली होती. ज्यामध्ये कल्याण डोंबिवलीसह ठाणे, मुंबई, दिल्ली, पंजाब, हरियाणा आदी राज्यांसह आफ्रिकेच्या केनिया, इथिओपिया, नायजेरिया देशांमधील १२ धावपटूही त्यामध्ये सहभागी झाले होते. तर केडीएमसी आयुक्त डॉ. इंदू राणी जाखड, डी सी पी अतुल झेंडे, उपायुक्त संजय जाधव, डॉ. प्रशांत पाटील आदींनी या आयमेथॉनमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. विशेष म्हणजे कल्याणच्या इतिहासात एखाद्या मॅरेथॉनमध्ये इतक्या मोठ्या संख्येने स्पर्धक सहभागी होण्याची ही पहिलीच वेळ ठरली. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी कल्याण आयएमएचे डॉ.आश्विन कक्कर, समीर पाटील, डॉ. विकास सुरंजे, डॉ. राजेश राजू, डॉ. अमित बोटकुंडले, डॉ.शुभांगी चिटणीस, डॉ. सोनाली पाटील यांच्यासह संपूर्ण कल्याण आयएमए टीमने विशेष मेहनत घेतली.

या स्पर्धेतील विजेत्यांना यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आले. यावेळी केडीएमसीचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांनी ऊर्जा बचत आणि संवर्धनाबाबत सादर केलेल्या जनजागृतीपर कार्यक्रमाला उपस्थितांनी मोठी दाद दिली.



# टिटवाळ्यातील रस्त्याचे संथगती काम शालेय विध्यार्थी व नागरिकांना त्रास

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
□ **प्रतिनिधी**

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महापालिका प्रशासना कडून मांडा पश्चिम भागातील मांडा मुख्य रस्ता ते वासुंद्री पुला पर्यंत नवीन रस्ता होणार आहे. या रस्त्याचे काम संथ गतीने सुरू असल्याने येणाऱ्या जाणाऱ्या वाहन चालकांना तसेच शाळेय विध्यार्थ्यांना व नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्याचे काम लवकरात लवकर करण्यात यावे यासाठी महापालिका आयुक्त यांची भेट घेणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते साईनाथ भोय यांनी दिली.

मांडा पश्चिम मुख्य रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरणाचे काम आरई इन्फ्रा कंपनी कडून सुरु आहे. गेल्या अनेक दिवसांपासून काम सुरू असून ते संथ गतीने सुरु आहे. मांडा पश्चिम मुख्य रस्ता हा रस्ता पुढे वासुंद्री, कोंढेरी, सांगोडा आदि गावांना जोडणारा रस्ता आहे. या भागातील नागरिकांना टिटवाळा रेल्वे स्टेशन कडे येणारा एकमेव रस्ता आहे. परंतु रस्त्याचे काम संथ गतीने सुरू आहे, तसेच पर्यायी व्यवस्था दुसऱ्या रस्त्याची नसतांना नागरिकांना तसेच वाहन चालकांना अडथळा होत आहे. याबाबत सामाजिक कार्यकर्ते साईनाथ भोय, ठाणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य रविश तांडेल, रिपाइंचे युवक अध्यक्ष सनी जाधव, लक्ष्मण भोईर, जयराम भोय, प्रतिक क्षीरसागर, प्रणय भोय, मोहन डमाले, अन्सर मन्यार, किरण पाटील, नरेंद्र पाटील आदी कार्यकर्त्यांनी या रस्त्याच्या कामाची पाहणी केली व संबंधित ठेकेदार यांनी जलद गतीने काम करावे अशा सुचना केल्या. याबाबत सामाजिक कार्यकर्ते साईनाथ भोय यांनी सांगितले की, मांडा पश्चिम मुख्य रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरणाचे काम सुरु आहे. परंतु हे काम अगदी संथ गतीने सुरु असुन या भागातील नागरिकांना तसेच वाहनचालकांना तासनतास थांबावे लागते. शाळेच्या बस यांनाही रस्त्याच्या कामाचा त्रास होतो. दुसऱ्या रस्त्याची पर्यायी व्यवस्था नाही, याची महापालिका प्रशासनाने दखल घेऊन या रस्त्याचे काम लवकरात लवकर करावे अन्यथा महापालिका आयुक्त यांनी ठेकेदार यांच्यावर कारवाई करावी यासाठी आपण लवकराच महापालिका आयुक्त यांची भेट घेणार आहेत असे सांगितले.

## कंत्राटी शिक्षक भरतीला ब्रेक

पान१ वरून ▶▶ फेब्रुवारीअखेर अपेक्षित आहे. उत्तीर्ण झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याचे पेपर बारकाईने तपासले जात आहेत. प्रत्येक उत्तराला अचूक गुण दिल्याची खात्री अधिकाऱ्यांकडून केली जात आहे. त्यामुळे निकालास आणखी दीड ते दोन महिने लागू शकतात. त्यानंतर 'टीईटी'त उत्तीर्ण विद्यार्थ्यांची जून-जुलैमध्ये 'टेट' घेण्याचे नियोजन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने केले आहे.

नववर्षात १० हजार पदे भरण्याची शक्यता

आता पवित्र पोर्टलच्या माध्यमातून नवीन वर्षात शिक्षक भरती होणार असून ज्या जिल्हा परिषदांमधील शिक्षकांच्या रिक्तपदांचे रोस्टर (बिंदूनामावली) अचूक आहे, कोणाचीही हरकत नाही तेथील ८० टक्के पदभरती होणार आहे. दुसरीकडे खासगी अनुदानित माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती देखील झालेली नाही. नवीन वर्षात शालेय शिक्षण विभागाकडून शिक्षक भरतीची खुशखबर येवू शकते. जवळपास १० हजार शिक्षकांची भरती होवू शकते, असे शालेय शिक्षण विभागातील वरिष्ठ सूत्रांनी सांगितले.

शालेय शिक्षण विभागाच्या सूचनांची प्रतीक्षा

दहापेक्षा कमी पटाच्या शाळांवर कंत्राटी शिक्षक घेण्याचा निर्णय यापूर्वीच झाला आहे. त्यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार कार्यवाही केली जाईल. शालेय शिक्षण विभागाकडून त्या मार्गदर्शक सूचनांची प्रतीक्षा आहे, असे पुणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले.

**कमी पटसंख्या जिल्हानिहाय शाळांची संख्या**

पुणे (१,०७९), सोलापूर (५३१), सातारा (९१७), नगर (६९६), धुळे (१२७), नंदुरबार (१९७), जळगाव (८८), बुलढाणा (१२५), अकोला (१६५), वाशीम (९२), अमरावती (३३६), वर्धा (२५४), नागपूर (४६४), भंडारा (१२६), गोंदिया (२१५), गडचिरोली (६६९), यवतमाळ (३६०), नांदेड (३६५), हिंगोली (७३), परभणी (१३२), जालना (२१३), औरंगाबाद (४४३), नाशिक (५०९), ठाणे (६२५), मुंबई (३१), रायगड (१,१९२), बीड (४६७), लातूर (१७९), उस्मानाबाद (१५६), रत्नागिरी (१,१२६), सिंधुदुर्ग (६९३), कोल्हापूर (४८०), सांगली (३७८).

## वाळू माफियांवर टाच...

पान१ वरून ▶▶ तलाठी कार्यालय ते जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हाधिकारी कार्यालय ते शासनस्तरापर्यंत कमीत कमी हेलपाटे मारून काम कसं करता येईल, यासंबंधी लवकरच उपाययोजना आखू आणि सर्वसामान्य जनतेला दिलासा देऊ. मुद्रांक शुल्क, जमाबंदी आयुक्त तसंच वाळूशी संबंधित धोरणांमध्ये सुलभीकरण करण्याचा तसंच वाळूमाफियांना पूर्णपणे पायबंद घालण्याचा माझा प्रयत्न आहे. धोरण प्रक्रियेत सुलभीकरण आणण्यासाठी इतर राज्यांतील उपयुक्त कायद्यांचाही अभ्यास करणार असून येत्या काळात महसूल विभागात सकारात्मक बदल आपल्याला पाहायला मिळतील, असं बावनकुळे म्हणालेत.

## शिक्षण विभागात सावळा गोंधळ

पान १ वरून ▶▶ रिक्त आहेत. विशेष म्हणजे याच तालुक्याचे जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुभाष पवार हे शिक्षण विभागाचे प्रमुख होते. तीच स्थिती कल्याण तालुक्यातील आहे. येथे पाच केंद्र प्रमुख पदे रिक्त आहेत. तर तीन शिक्षण विस्तार अधिकारी नाहीत.

अंबरनाथ तालुक्यात ना शिक्षण अधिकारी फक्त शिक्षण विस्तार अधिकारी, सात केंद्र प्रमुख रिक्त. भिवंडी तालुक्यात हीच स्थिती येथील ३० केंद्र प्रमुख व १० विस्तार अधिकारी भरलेच नाहीत. येथे ही प्रभारी गट शिक्षण अधिकारी कार्यरत आहेत.

**शहापूर तालुक्यात सहा केंद्र प्रमुख पदे रिक्त आहेत. तर सहा शिक्षण विस्तार अधिकारी पदे भरलेली नाहीत.**

ठाणे जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागा आंतर्गत ठाणे जिल्हा परिषदेचे एक हजाराहून अधिक शाळा आहेत. त्यामध्ये ऐशी हजाराहून अधिक विध्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विध्यार्थ्यांच्या मूल्यमापन प्रक्रियेसाठी असणारा अधिकारी नाहीत. पुरेशे शिक्षक पटानुसार उपलब्ध नाहीत. या स्थितीत विद्यार्थ्यांचे दर्जेदार शिक्षण तरी कसे होणार आहे. ते देखील राज्याच्या राजधानी जवळील ठाणे जिल्ह्यात ! दरम्यान , पदोन्नती द्वारे ही पदे लवकरच भरली जातील असे बाळासाहेब राक्षे जिल्हा प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी सांगितले आहे.

महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट आणि पोटगी, नावात बदल बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.
कार्यालय - 9619188558 ■ +91 9158078601
ईमेल- jeevandeepvartanews2020@gmail.com

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी